# महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१९

## पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे

जाहिरात क्रमांक ठिकाण : पुणे दि. /०८/२०१९

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दि.१८/०१/२०१९ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणा नुसार पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी ७७ पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

### पोलीस शिपाई

| अ.क्र. | अजा. | अज | विज- अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्युएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकुण** | ०८ | - | - | - | - | - | ०१ | २६ | ११ | ०८ | २३ | ७७ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०५ | - | - | - | - | - | ०१ | ०८ | ०२ | ०५ | ०८ | २९ |
| महिला ३० % | ०२ | - | - | - | - | - | - | ०८ | ०३ | ०२ | ०७ | २२ |
| खेळाडु ५% | ०० | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०३ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ०० | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०३ |
| भुकंपग्रस्त २ % | ०० | - | - | - | - | - | - | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| माजी सैनिक १५% | ०१ | - | - | - | - | - | - | ०४ | ०२ | ०१ | ०३ | ११ |
| अंशकालीन पदवीधर ५% | ०० | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०३ |
| पोलीस पाल्य ३% | ०० | - | - | - | - | - | - | ०१ | ०० | ०० | ०१ | ०२ |
| गृहरक्षक दल ५% | ०० | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०३ |
| अनाथ | ०० | - | - | - | - | - | - | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| **एकुण** | ०८ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | २६ | ११ | ०८ | २३ | ७७ |

अ) उपरोक्त पदे ही दि.३१/१२/२०१९ अखेर पर्यत रिक्त होणा-या संभाव्य पदाची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहे. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागिल अनुशेष व बिंदुनामावली पडताळणीच्या अधीन राहुन निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतिम निवड यादीतील प्रवर्गानिहाय गुणवत्ता क्रमांकानुसार येणा-या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गानिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणा संदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधीन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे नियुक्ती प्राधिका-यास राहतील. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

ड) या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकातील पदे भरती साठी उपलब्ध नाहीत.

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई पदासाठी पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम -२०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह लागु आहे. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर (Home page) वर व www.punerailwaypolice.gov.in. वर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरती साठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागु राहील.

**महत्वाची टीप :-**

पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांना दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२१३४/२६१३२८०२/१०६४ वर त्वरीत संपर्क साधुन तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे या कार्यालयातील वरीष्ठ अधिकां-यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती- २०१९ तथा अपर पोलीस अधीक्षक / पोलीस उपअधीक्षक, (मुख्यालय), लोहमार्ग, पुणे यांचेशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयात ०२२-२२०२३६३७ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल. उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्प लाईन नंबर वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था/ कार्यालयाचे नांव | दुरध्वनी /मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे | ०२०-२५५४१६५६<br>०२०-२५५४१६३१ |

(दिपक साकोरे)
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे

प्रत सादर,
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई.